# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे — ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :— ''राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :— डीबीटी पोर्टलव्दारे प्रलंबित शिष्यवृत्ती प्रदान तातडीने करण्याबाबत...''**

**संदर्भ :— १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. उशिंस शिष्यवृत्ती/प्र.शि./२०२४, दि. १२/०९/२०२४.**
**२. शासन पत्र क्र. शिष्यवृत्ती—२०२४/प्र.क्र.३१७/तांशि—४, दि. ११/०९/२०२४.**

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भीय पत्रानुसार सन २०१८—१९ ते सन २०२३—२४ या कालावधीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम महाआयटीच्या सेंट्रल पुल खात्यावर विद्यार्थ्यांनी बॅक खाते बंद केल्यामुळे, आधार बॅक खातेला लिंक नसल्यामुळे, खाते निष्क्रिय असल्यामुळे, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्या नावात बदल झाल्यामुळे, केवायसी अद्ययावत नसल्यामुळे, UID Disable इत्यादी कारणांमुळे प्रलंबित असल्याचे शासनास दिसून येत आहे. शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याची कारणे महाविद्यालयाच्या Principal Login > Report > Student Institute detail Reason Report मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी आपल्या स्तरावर एक विशेष मोहीम राबवून सन २०१८—१९ ते २०२३—२४ या कालावधीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित असल्याची कारणांची पुर्तता विद्यार्थ्यांकडून तात्काळ पूर्ण करून घेण्यात यावी. तसेच विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक भ्रमणध्वनी/ईमेल वर संदेश देण्यात यावा.

सबब, मा. प्राचार्य/मा. संचालक, यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकावरील केलेला कार्यवाही अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.

(signature) 27/9/2024
(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/3084
दिनांक : २७/०९/२०२४

सोबत:— वरिलप्रमाणे.

**प्रत:** मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -०२०/२९७०७०९८/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिंस शिष्यवृत्ती/ प्र.शि./२०२४ दिनांक-

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय - राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :- डीबीटी पोर्टलव्दारे प्रलंबित शिष्यवृत्ती प्रदान तातडीने करण्याबाबत.**

संदर्भ - शासन पत्र क्र. शिष्यवृत्ती-२०२४/प्र.क्र. ३१७/तांशि-४,दि. ११.०९.२०२४.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये, ११ सप्टेंबर २०२४ रोजी मा. मुख्य सचिव यांच्याकडे आयोजित आढावा बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार, महाआयटी कडील प्राप्त आकडेवारीनुसार डीबीटी पुल खाते मध्ये ७.८४ कोटी रक्कम प्रलंबित असून, प्रलंबित रक्कमांचे प्रदान संबंधित पात्र लाभार्थी यांना तात्काळ करण्यासाठी शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधून संस्था निहाय लाभार्थ्यांची नावे त्यांना कळवावी. तसेच शिष्यवृत्ती रक्कमेचे प्रदान करण्याच्या प्रक्रियेतील त्रुटींचे तातडीने निवारण करावे व हे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम महाआयटीच्या सेंट्रल पुल खात्यावर,विद्यार्थ्यांनी बँक खाते बंद केल्यामुळे, आधार बँक खातेला लिंक नसल्यामुळे, खाते निष्क्रिय असल्यामुळे, विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांच्या नावात बदल झाल्यामुळे, केवायसी अद्ययावत नसल्यामुळे,UID Disable इत्यादी कारणांमुळे प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याची कारणे महाविद्यालयाच्या **Principal Login** > Report > Student Institute detail Reason Report मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर दि. २१.०९.२०२४ पर्यंत एक विशेष मोहीम राबवून सन २०१८-१९ ते२०२३-२४ या कालावधीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित असल्याची कारणांची पुर्तता विद्यार्थ्यांकडून तात्काळ पूर्ण करुन घेण्यात यावी. तसेच विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक भ्रमणध्वनी/ ई मेल वर संदेश देण्यात यावा.

सर्व महाविद्यालयांकडून करण्यात आलेल्या कार्यवाही अहवाल संचालनालयास **दि. २१.०९.२०२४.** पर्यंत सादर करावा. उपरोक्त कार्यवाहीबाबत आढावा बैठक मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, हे स्वत: आढावा घेणार असल्याने सदरहू कार्यवाही विहीत कालमर्यादेत पूर्ण करावी.

DR. Admission (PG)

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 12-09-2024 18:25:25

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीकरीता-

१.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानितं, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र०२२०४०९३५.
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्र.शिष्यवृ २०२४/प्र.क्र.३१७/तांशि ४ दिनांक: ११ सप्टेंबर, २०२४.

तातडीचे

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

**विषय : राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :- डीबीटी पोर्टलद्वारे प्रलंबित शिष्यवृत्ती प्रदान तातडीने करण्याबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत दि.११ सप्टेंबर, २०२४ रोजी मा.मुख्य सचिव यांच्याकडे आयोजित आढावा बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खालील मुद्द्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

१. महाआयटी कडील प्राप्त आकडेवारीनुसार डीबीटी पुल अकाऊंट मध्ये प्रलंबित रक्कम पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | संचालनालय | MAHA IT Pool Account | | |
|---|---|---|---|---|
| | | Beneficiary Count | Beneficiary Amount | Amount (In Cr) |
| A | तंत्र शिक्षण संचालनालय | 1,07,544 | 30,53,86,277 | 30.54 |
| B | उच्च शिक्षण संचालनालय | 1,22,909 | 7,84,13,937 | 7.84 |

उपरोक्त प्रलंबित रकमांचे प्रदान संबंधित पात्र लाभार्थी यांना तात्काळ करण्यासाठी शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधून संस्था निहाय लाभार्थ्यांची नावे त्यांना कळवावी. तसेच, शिष्यवृत्ती रकमेचे प्रदान करण्याच्या प्रक्रियेतील त्रुटींचे तातडीने निवारण करावे व हे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. याकरिता महाआयटी सोबत संपर्क साधून संस्था स्तरावर विशेष मोहिम राबवावी व त्याचे पर्यवेक्षण संबंधित संचालनालयाने करावे.

२. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च अधिकार समितीच्या निर्णयानुसार तसेच, दि.३० नोव्हेंबर, २०२१ च्या शासन निर्णयानुसार डीबीटी पोर्टल द्वारे रकमांचे वितरण प्रभावीपणे होण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी त्यांच्या योजनांचे स्वतंत्र खाते स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) मध्ये उघडावे व याबाबतची माहिती Public Financial Management System (PFMS) या

प्रणालीवर नमूद करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, याबाबतची कार्यवाही अद्याप अपूर्ण असून याची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

Summary Status of Department wise and Scheme Specific Account

| Sr. No. | Directorate | Post Matric Schemes | SNA account is Activated (GoI) | Scheme Specific Account Activated | SSA Activated PFMS Mapping to be Done |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Directorate of Higher Education | 14 | - | - | 14 |
| 2 | Directorate of Technical Education | 3 | - | - | 3 |
| | | | | Total | 17 |

उपरोक्त तपशिलानुसार अद्यापही PFMS Mapping कार्यवाही अपूर्ण आहे. ही प्रक्रिया दि.२१ सप्टेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करावी. त्यासाठी आवश्यकता असल्यास महाआयटीची तांत्रिक मदत घ्यावी.

३. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी, मंजूर अर्जाकरीता DBT Pool Account मध्ये असलेली रक्कम व वितरित रक्कम यामध्ये बरीच तफावत असून वितरणाअभावी प्रलंबित रकमेचा डॅशबोर्ड वरील तपशील पुढील प्रमाणे आहे:-

| Directorate | Applications Received | Applications after Cancellations | Approved by Institutes | Approved by Depts. | Amount Credited in Pool A/C | Total Disbursed (In Rs. Cr.) | % Disb. Done | Pending Disb. (In Rs. Cr.) | % Disb. Pending |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DHE | 12,88,409 | 11,47,146 | 10,51,614 | 10,41,697 | 624.63 | 614.26 | 98.34 | 10.37 | 1.66 |
| DTE | 22,07,596 | 18,09,206 | 17,36,633 | 17,32,233 | 5330.63 | 5297.8 | 99.38 | 32.83 | 0.62 |

उपरोक्त प्रलंबित रक्कम तातडीने विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी संस्था निहाय विद्यार्थ्यांची यादी तयार करून महाआयटी यांना तसेच, संबंधित संस्थेला पाठवावी. तसेच त्रुटींची पूर्तता करण्याबाबत विद्यार्थ्यांना ई-मेल / मेसेज द्वारे कळविण्यात यावे.

उपरोक्त कार्यवाही दि.२१ सप्टेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करावी. याबाबतची आढावा बैठक प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे लवकरच आयोजित करण्यात येत असून, बैठकीचा दिनांक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

(सतीश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-निवडनस्ती/तांशि-४.